## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**मराठी विभाग – जागतिक महिला दिन**

सकाळ

# महिलांविषयी समानतेची भावना निर्माण व्हावी

## डॉ. शिंदे यांचे मत; राजगुरू महाविद्यालयात जागर स्त्रीशक्तीचा अभियान

**राजगुरुनगर, ता. ९ :** जागतिक महिला दिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागातर्फे १ ते ८ मार्च दरम्यान 'जागर स्त्रीशक्तीचा' हे अभियान राबविण्यात आले. शिक्षणाची समान संधी मिळाली तरी मुलींविषयी समानतेची भावना निर्माण करण्यात समाज म्हणून आपण अजूनही यशस्वी झालो नसल्याचे समारोपाच्या कार्यक्रमात, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले.

या कार्यक्रमांतर्गत 'उंच माझा झोका' या विषयावर मुक्त संवाद, 'तिला काही सांगायचंय' या विषयावर



**राजगुरुनगर (ता. खेड) : स्त्रियांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची आणि स्त्री-जन्माचे स्वागत करण्याची शपथ देताना शिक्षक.**

स्वगत, 'आजची स्त्री खरंच आनंदी आहे का?' या विषयावर निबंध स्पर्धा, 'आजच्या स्त्रियांपुढील आव्हाने' या विषयावर चर्चासत्र, 'मुलगी शिकली प्रगती झाली?' या विषयावर परिसंवाद, अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

डॉ. संजय शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रत्येक मुलीने स्वतःला सिद्ध करणे गरजेचे असल्याचे वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी हर्षदा शिंदे हिने सांगितले. प्राजक्ता मांजरे हिने महिला निसर्गतः पुरुषांपेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनण्याचे आवाहन केले. महिलांना समानतेची वागणूक देण्याविषयी या वेळी शपथ देण्यात आली.सायली दाते, विद्या गाडे, शिवानी बोंबले, चेतना बाविस्कर, सायली शिंदे, हर्षदा राळे, हर्षदा शिंदे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले.

Pune, District-Today
10/03/2019 Page No. 6



राजगुरू महाविद्यालयात जागर स्त्रीशक्तीचा अभियान.

# राजगुरू महाविद्यालयात जागर स्त्रीशक्तीचा

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागर स्त्रीशक्तीचा अभियान राबविण्यात आले. त्याअंतर्गत दि. १ ते ८ मार्चदरम्यान उंच माझा झोका हा मुक्त संवाद, तिला काही सांगायचंय विषयावर स्वगत, आजची स्त्री खरंच आनंदी आहे का? वर निबंध स्पर्धा, आजच्या स्त्रियांपुढील आव्हाने यावर चर्चासत्र आणि मुलगी शिकली प्रगती झाली? या विषयावर परिसंवाद घेण्यात आले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे म्हणाले की, जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव आहे. तिच्या आत्मसन्मानाचा दिवस आहे. स्त्रियांनी स्वतःला काय पाहिजे याचा शोध घेतील तेव्हाच तिचे आनंदी आणि कर्तबगार व्यक्तिमत्त्व उमलेल.

शिक्षणाची समान संधी मिळाली तरी मुलींविषयी समानतेची भावना निर्माण करण्यात समाज म्हणून आपण अद्याप यशस्वी झालो नाहीत. स्त्रीने बाईपणाच्या चौकटीतून बाहेर पडून आपले अवकाश स्वतंत्र असू शकतं याची जाणीव करून घ्यावी, तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## स्त्री जन्माचे स्वागत करणार

विद्यार्थ्यांना स्त्रियांचा आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची; तसेच स्त्री जन्माचे स्वागत करणारी शपथ देण्यात आली.

प्रथम वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी हर्षदा शिंदे हिने महिलांनी जगातील सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे, असे सांगून प्रत्येक मुलीने स्वतःला सिद्ध करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

प्राजक्ता मांजरे हिने महिला निसर्गतः पुरूषांपेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आत्मनिर्भर बनावं, असं आवाहन केलं.

या उपक्रमात सायली दाते, विद्या गाडे, शिवानी बोंबले, चेतना बाविस्कर, सायली शिंदे, हर्षदा राळे, हर्षदा शिंदे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला. याचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले.

प्रा. अनिल कुलकर्णी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगिनी राऊत उपस्थित होते.

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय



राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने दि. १ ते ८ मार्च दरम्यान जागर स्त्रीशक्तीचा या अभियानांतर्गत उंच माझा झोका या विषयावर मुक्त संवाद झाला. तिला काही सांगायचंय या विषयावर स्वगत, आजची स्त्री खरंच आनंदी आहे का? या विषयावर निबंध स्पर्धा, आजच्या स्त्रियांपुढील आव्हाने या विषयावर चर्चासत्र, मुलगी शिकली प्रगती झाली? या विषयावर परिसंवाद आदि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना आदिशक्तीच्या रूपातील स्त्रियांचा आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची तसेच स्त्री जन्माचे स्वागत करणारी शपथ देण्यात आली. या उपक्रमात सायली दाते, विद्या गाडे, शिवानी बोंबले, चेतना बाविस्कर, सायली शिंदे, हर्षदा राळे, हर्षदा शिंदे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला. या सर्व उपक्रमांचे आयोजन प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले. या प्रसंगी प्रा. अनिल कुलकर्णी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगिनी राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी, तर आभार प्रा. योगिनी राऊत यांनी मानले.

लोकमत

# जागर स्त्रीशक्तीचा



महिला दिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात स्त्रीजन्माचे स्वागत करण्याची शपथ देण्यात आली.

## हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : जागतिक महिला दिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने १ ते ८ मार्च 'जागर स्त्रीशक्तीचा' अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या अभियानांतर्गत 'उंच माझा झोका' या विषयावर मुक्त संवाद, 'तिला काही सांगायचंय' या विषयावर स्पर्धा, 'आजची स्त्री स्वतंत्र आनंदी आहे का?' या विषयावर निबंध स्पर्धा, 'आजच्या स्त्रियांपुढील आव्हाने' या विषयावर चर्चासत्र, 'मुलगी शिकली, प्रगती झाली' या विषयावर परिसंवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अभियानाच्या समारोप कार्यक्रमात बोलताना कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे म्हणाले, की जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव असून तिच्या आत्मसन्मानाचा दिवस आहे. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू बाहेर आणण्यासाठी स्त्रियांना आपले स्वत्व भान जागृत करणे आवश्यक आहे.

विद्यार्थिनी हर्षदा शिंदे हिने महिलांनी जगातील सर्वच क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे, असे सांगून प्रत्येक मुलीने स्वत:ला सिद्ध करणे गरजेचे असल्याचे सांगितले. तर, प्राजक्ता मांजरे हिने महिला निसर्गत: पुरुषांपेक्षा अधिक सहनशील व संवेदनशील असतात. या गुणांचा उपयोग करून मुलींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करताना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनण्याचे आवाहन केले.

या वेळी विद्यार्थ्यांना आदिशक्तीच्या रुपातील स्त्रियांचा आदर करण्याची, त्यांना समतेची व सन्मानाची वागणूक देण्याची तसेच स्त्रीजन्माचे स्वागत करणारी शपथ देण्यात आली. या उपक्रमात सायली दाते, विद्या गाडे, शिवानी बोंबले, चेतना बाविस्कर, सायली शिंदे, हर्षदा राळे, हर्षदा शिंदे या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या उपक्रमांचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 7 Mar 09, 2019
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख